जनसंपर्क अधिकारी, पोलीस आयुक्तालय,
ठाणे शहर
ईमेल :- cp.thane.pro@mahapolice.gov.in
मो.क्र. ९८१९२०८२७९

प्रेस नोट **दि.२७/०२/२०२५**

‘‘ वाहनांच्या काचा तोडुन बॅग लिफ्टींग करणाऱ्या टोळीस अटक ’’

दि.२६/०२/२०२५ रोजी गुन्हे शाखा, घटक-१, ठाणे यांना माहिती मिळाली की, घोळ गणपती, पुजा पंजाब हॉटेल जवळ, महापे रोड, ठाणे पश्चिम या ठिकाणी पार्किंग मध्ये उभ्या केलेल्या वाहनाच्या काचा तोडून वाहनातील बॅग व किमंती मुददेमाल चोरी करणारे इसम येणार आहेत. त्या अनुषंगाने गुन्हे शाखा, घटक-१, ठाणेच्या पोलीस पथकाने घोळ गणपती, पुजा पंजाब हॉटेल जवळ, महापे रोड, ठाणे प. येथे सापळा रचला असता, तेथे त्यांना दोन इसम संशयास्पद स्थितीत मोटर सायकलवर दिसले. त्यांना ताब्यात घेण्याचा प्रयत्न करीत असताना सदर इसम हे नवी मुंबईच्या दिशेने पळुन जावू लागल्याने पोलीस पथकाने त्यांचा पाठलाग करुन त्यांना दर्शन लॉज जवळ, वाशी, सेक्टर ११, नवी मुंबई या ठिकाणी पकडले व त्यांच्याकडे केलेल्या चौकशीत त्यांनी त्यांची नावे ०१) अरविंद दिनेश जाटव, वय २६ वर्षे, रा. ग्राम-जगमोहनपुरा,जिल्हा-भरतपुर, राज्य-राजस्थान ०२) साहिल कुमार रमेशचंद्र जाटव, वय २४ वर्षे, रा.ग्राम-जगमोहनपुरा, आनंदनगर कॉलनी, जिल्हा- भरतपुर, राज्य- राजस्थान व सध्या दर्शन लॉज, जुहूनगर, वाशी, नवी मुंबई असे सांगितले. तसेच त्यांच्याकडे सखोल चौकशी केली असता, त्यांनी ठाणे, नवी मुंबई परिसरातील शिळडायघर, खारघर, पनवेल तालुका, कोपर खैरणे या पोलीस ठाण्याच्या हद्दीत मोटार सायकल व बॅग लिफ्टींगचे ०४ गुन्हे केले असल्याची कबुली दिली असून वरील चारही पोलीस ठाण्याचे गुन्हे उघडकीस आले आहे. सदर आरोपींच्या ताब्यातुन वाहनांच्या काचा फोडण्यासाठी वापरण्यात येणारे ब्रेकर, मोटर सायकल, चोरलेल्या बॅगा, कागदपत्रे तसेच पेपर स्प्रे ची बॉटल इत्यादी मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

सदर प्रकाराबाबत आरोपीविरुध्द शिळडायघर पोलीस ठाणे गुन्हा रजि.नं. । २०२/२०२५ भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ३०३(२), ३२४(४) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून गुन्हयाच्या पुढील तपासकामी त्यांना शिळ डायघर पोलीस ठाण्याच्या ताब्यात देण्यात आले आहे.

सदर कामगिरी श्री.अमरसिंह जाधव, पो.उप आयुक्त, गुन्हे, श्री. शेखर बागडे, सपोआ, शोध-१, गुन्हे शाखा यांच्या मार्गदर्शनाखाली वपोनि/सचिन गायकवाड, सपोनि/यादव, पोउपनिरी/घुगे, पोउपनिरी/पाटील, सपोउपनिरी/नाईक, सुनिल माने, पोहवा/सोनकडे, प्रशांत निकुंभ, धनंजय आहेर, चापोहवा/शशिकांत सावंत, पोलीस अंमलदार सागर सुरळकर, मयुर लोखंडे, सर्व नेम.गुन्हे शाखा, घटक-१, ठाणे यांच्या पथकाने केली आहे.

(शैलेश साळवी)
वरिष्ठ पोलीस निरीक्षक तथा जनसंपर्क
अधिकारी, पोलीस आयुक्तालय,
ठाणे शहर